महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001
दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152
ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

---

वाचले :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. या कार्यालयाचे आदेश क्र दंडप्र-01/कावि/2020/56, दिनांक 22/03/2020
5. गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे कडील निर्देश क्रमांक 40-3/2020 दिनांक 24 मार्च, 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र. क्र दंडप्र-01/कावि/2020/64, दिनांक 25 मार्च, 2020

---0000---

क्र दंडप्र-01/कावि/2020/80

दिनांक 28 मार्च, 2020

**आदेश :-**

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने करोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केलेला आहे. तसेच करोना विषाणूचा प्रसार भारतात , महाराष्ट्रात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे, यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद आदेश दिनांक 22 मार्च, 2020 अन्वये जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून जळगांव जिल्हयातील सर्व उदयोग/ कारखाने/ कंपनी व तत्सम आस्थापना (अत्यावश्यक व जिवनावश्यक वस्तू/सेवा आस्थापना वगळून) पूर्णपणे बंद करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

तसेच उपोद्घातात नमूद गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे कडील निर्देश दिनांक 24 मार्च, 2020 अन्वये शासनाकडून घोषित करण्यात आलेले जिवनावश्यक व अत्यावश्यक वस्तू / सेवा यांचेशी संबंधित सर्व उदयोग/ कारखाने/ कंपनी , तत्सम आस्थापना व Continous Processsing ची गरज असलेल्या आस्थापना सुरु ठेवण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, **मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून "**जळगांव जिल्हयात** जिवनावश्यक व अत्यावश्यक वस्तू / सेवा यांचेशी संबंधित सर्व उदयोग/ कारखाने/ कंपनी , तत्सम आस्थापना व Continous Processsing ची गरज असलेल्या आस्थापना कमीत कमी कर्मचारी (~~5 % पेक्षा~~

~~अधिक नसेल~~) यांच्या सह सुरु ठेवण्याकरीता परवानगी देणे व आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता पुढील आदेश होई पावेतो खालील प्रमाणे जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती गठीत करीत आहे.

| अ.क्र. | अधिकारी यांचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| 1 | विशेष भूसंपादन अधिकारी तथा नोडल अधिकारी, जळगांव | अध्यक्ष |
| 2 | सहायक कामगार आयुक्त, जळगांव | सदस्य |
| 3 | सहायक आयुक्त अन्न प्रशासन जळगांव | सदस्य |
| 4 | सहायक आयुक्त औषध प्रशासन जळगांव | सदस्य |
| 5 | उप अभियंता, एम. आय. डी. सी, जळगांव | सदस्य |
| 6 | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव | सदस्य सचिव |

सदर समितीने आवश्यकते प्रमाणे त्यांचे अधिनस्त कार्यालयातील कर्मचारी यांच्या सेवा उपरोक्त कालावधीकरीता अधिग्रहीत करण्यात याव्यात. तसेच उपोद्घातात नमूद भारत सरकार यांचे कडील निर्देश दिनांक 24 मार्च, 2020 मध्ये दिलेल्या सुचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व समितीकडे प्राप्त होणा-या अर्जावर तात्काळ कार्यवाही करावी.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 28/03/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी सविनय सादर**

1. मा अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. पोलीस अधिक्षक जळगांव
2. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जळगांव
3. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
4. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
5. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जळगांव
6. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव
7. सहायक कामगार आयुक्त, जळगांव
8. उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, जळगांव
9. सहायक आयुक्त अन्न प्रशासन, जळगांव
10. सहायक आयुक्त औषध प्रशासन जळगांव
11. उपअभियंता, एम. आय. डी. सी, जळगांव

**प्रत :- जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- म. संचालक, येरवडा कारागृह, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, पुणे** यांनी सदरील आदेशाचे शासकीय राजपत्रात प्रसिध्दी देऊन त्याची दोन प्रती या कार्यालयास पुरविण्यात याव्यात.

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.